# विषय : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास: प्रारंभ ते इ.स.१६००
## [DSE 1 C (3+1)]

## घटक १) – वाङ्मयेतिहास संकल्पना आणि मराठी भाषा, वाङ्मयाचा उगम

### १) वाङ्मयेतिहास : संकल्पना आणि स्वरूप

**प्रास्ताविक :**

मानवाच्या संदर्भात विशिष्ट काल आणि अवकाशात घडणारी मानवी व नैसर्गिक घटिते म्हणजेच इतिहास. वाङ्मयाच्या इतिहासात समाज, संस्कृती, धर्मकल्पना, तत्त्वज्ञान, आर्थिक, राजकीय, नैसर्गिक पर्यावरण, वर्णवर्ग, वाङ्मयीन व कला परंपरा इ. संदर्भ येतात. वाङ्मयेतिहास लेखकाची जीवनदृष्टी, भूमिका, तत्त्वज्ञान या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**इतिहास :**

मानव आणि मानवेत्तर सजीवसृष्टी या सर्वांना इतिहास असतो. इतिहास कधीही स्थिर नसतो. माणसाच्या गरजेनुसार नवे घडताना जे मागे पडते तो इतिहास असतो. इतिहासाच्या संकल्पनेत भूतकालीन घटना आणि समकालीन वास्तवातून निर्माण झालेली दृष्टी हे घटक आधारभूत असतात

**वाङ्मयेतिहास : संकल्पना :**

**एका विशिष्ट भाषेतील समग्र वाङ्मयकृतींचा आणि वाङ्मयीन घडामोडींचा एक विशिष्ट दृष्टिकोन घेऊन केलेला ऐतिहासिक अभ्यास म्हणजे वाङ्मयेतिहास.** वाङ्मयेतिहास ही वाङ्मयाच्या अभ्यासाची एक पद्धती आहे आणि ती वाङ्मयसिद्धान्त आणि वाङ्मयीन टीका या वाङ्मयाभ्यासाच्या इतर दोन पद्धतींहून पूर्णपणे वेगळी आहे. वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा-प्रवृत्तींची आणि प्रभाव-परिणामांची कालसंगत अशी जाणीव प्रस्थापित करणे, हे वाङ्मयेतिहासाचे कार्य असते. वाङ्मयनिर्मिती ही अखेरतः मानवी कृती आहे. त्यामुळे एखाद्या मानवसमूहाचा त्याच्या स्वतःच्या वाङ्मयाद्वारे झालेला विशिष्ट कालखंडातील आविष्कार टिपणे आणि स्पष्ट करणे असेही वाङ्मयेतिहासाचे कार्य सांगता येते. या अर्थाने वाङ्मयेतिहास हा त्या विशिष्ट समाजाच्या विशिष्ट कालखंडातील संवेदनशीलतेचा इतिहास असतो वाङ्मयकृती आणि वाङ्मयीन वातावरण यांची मिळून जी वाङ्मयव्यवस्था निर्माण होते, तिचे विशिष्ट तिचे देशकालपरिस्थितिनुसार आकलन करून घेणे हे वाङ्मयेतिहासाचे ध्येय असते.

**व्याख्या :**

**वसंत आबाजी डहाके :** एक संस्कृती असलेल्या, एकभाषा असलेल्या भूप्रदेशातील लोकांच्या साहित्याचा इतिहास म्हणजे मराठी वाङ्मयाचा इतिहास.

वाङ्मयेतिहास म्हणजे केवळ वाङ्मयांतर्गत घटकांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास वाङ्मयेतिहासाची संकल्पना म्हणजे उघडच इतिहास आणि टीका यांचे एकत्रीकरण आहे अशी**क्रेन** यांची संकल्पना आहे

**प्रा. गंगाधर पाटील :** साहित्यकृती व वाचक यांच्यामधील परस्पर संबंधाचा इतिहास म्हणजे साहित्येतिहास होय.

**वाङ्मयेतिहासलेखनाची सामग्री :**

**मुद्रणपूर्व काळातील हस्तलिखिते आणि तदनंतरचे मुद्रित वाङ्मय ही वाङ्मयेतिहासलेखनाची मुख्य सामग्री होय.** परंतु या वाङ्मयकृतींमागील वाङ्मयीन वातावरणाचाही परामर्श वाङ्मयेतिहासलेखकाला घ्यावा लागतो. लेखकांची वाङ्मयीन चरित्रे, प्रकाशनसंस्था, साहित्यविषयक कार्य करणाऱ्या संस्था, वाचकवर्ग आणि त्याची अभिरुची, वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथमाला इ. वाङ्मयप्रसाराची विविध माध्यमे, वाङ्मयाशी अनुबंध असणाऱ्या नाट्यादी ललित कला, वाङ्मयीन चळवळी, चर्चासत्रे, परिसंवाद आणि सभासंमेलने, विविध स्वरूपांचे वाङ्मयीन पुरस्कार, पारितोषिके, अनुदाने व शिष्यवृत्ती, शालेय व विद्यापीठीय पातळीवरील वाङ्मयाचे अध्ययन-अध्यापन अशा अनेकविध गोष्टी वाङ्मयीन वातावरण घडवीत असतात. त्यामुळे या सामग्रीचाही विचार वाङ्मयेतिहासलेखकाला करावा लागतो. वाङ्मयकृती व वाङ्मयीन वातावरण यांवर समाजातील सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, इ. घडामोडींचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम असतो. त्यामुळे त्यांचे यथोचित भान वाङ्मयेतिहासलेखकाला ठेवावे लागते. वाङ्मयेतिहास हा अशा रीतीने समाजाच्या वाङ्मयीन संचिताचाच ऐतिहासिक शोध घेण्याचा एक प्रयत्न असतो.

**‘वाङ्मयेतिहास’ ही वाङ्मयीन अभ्यासाची स्वतंत्र अभ्यासशाखा :**

वाङ्मयेतिहास म्हणजे वाङ्मयीन टीकेचा एक उपशाखा आहे, असे परवापरवापर्यंत मानले जात होते; परंतु यूरोप–अमेरिकेतील अलीकडील वाङ्मयेतिहास अभ्यासकांच्या प्रयत्नांमुळे ‘वाङ्मयेतिहास’ ही वाङ्मयीन अभ्यासाची (‘लिटररी स्टडीज’ची) स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून मान्यता पावल्याचे दिसते याचे एक कारण म्हणजे

प्रत्यक्ष वाङ्मय, विविध वाङ्मयसिद्धान्त (थिअरीज ऑफ लिटरेचर) आणि वाङ्मयीन टीका या सर्वांची एक सुसंगत व्यवस्था लावून दाखविण्याची शक्यता वाङ्मयेतिहासविद्यावेत्ते बोलून दाखविताना दिसतात. इंग्लिश लिटररी हिस्टरी आणि न्यू लिटररी हिस्टरी यांसारख्या केवळ वाङ्मयेतिहासाच्या तत्त्वविचाराला वाहिलेल्या आणि दीर्घकाळ चाललेल्या पत्रिका (जर्नल्स) वाङ्मयेतिहास ही स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून मान्यता पावल्याच्याच द्योतक होत २५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट १९६१ या कालावधीत न्यूयॉर्क विद्यापीठात भरलेली 'नाइन्थ कॉंग्रेस इंटरनॅशनल फेडरेशन फॉर मॉडर्न लँग्वेजीस अँड लिटरेचर' ही आंतरराष्ट्रीय परिषद केवळ वाङ्मयेतिहासाचाच विचार करण्यासाठी निमंत्रित केली गेली होती. या सर्व गोष्टी वाङ्मयेतिहास ही वाङ्मयीन अभ्यासाची स्वतंत्र अभ्यासशाखा आहे, हेच सिद्ध करतात.

**वाङ्मयेतिहास : स्वरूप –**

वाङ्मय ही एक कला आहे. तिचा जन्म समाजात होतो. व्यक्ती ही वाङ्मयनिर्मितीची शक्ती असते. म्हणजे तिचे पोषण रसिकवर्गाकडून होते. रसिकवर्ग हा समाजाचाच एक घटक असतो. त्या अर्थाने कलेचा इतिहास हा समाजाच्या इतिहासाचाच एक भाग असतो.

वाङ्मयेतिहासाचे स्वरूप हे आंतरिक व्यावहारिक गरजांवर अवलंबून असतेस्वकालीन ज्ञान, सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक-परिस्थिती, स्वकालीन उपलब्ध ज्ञान इतकीच मर्यादित असते. वाङ्मयाबाबतच्या गरजाच वाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टी नियंत्रित करीत असतात. हा स्वीकारलेला दृष्टिकोन वाङ्मयेतिहासाचे स्वरूप निश्चित करतो. **काळ बदलतो, परिस्थिती बदलते, विचारव्यूह बदलतात, ज्ञानात भर पडते. परिणामी नव्याने वाङ्मयेतिहास लिहिला जातो. हा इतिहास ही अंतिम ठरत नाही. नव्याने सत्य समोर येत असतात.**

वाङ्मयेतिहासकाराने स्वत:च्या पूर्वनिश्चित दृष्टीकोनाधारे वाङ्मयेतिहासाची रचना करणे संयुक्तिक ठरेल त्याच्या दृष्टीकोनाचे केंद्र वाङ्मयाचे वाङ्मयपण हेच असायला हवे. त्याने वाङ्मयतर दृष्टीकोनही स्वीकारायला हवा. पण **वाङ्मयीन दृष्टीकोणाला धक्का न पोहचता वाङ्मयाच्या स्थितीगतीचे आलेखन व्हायला हवे.** सामाजिक दृष्टीकोन स्वीकारल्याने वाङ्मयेतिहासाचे रूप समाजेतिहासाचे होऊ नये ही खबरदारी वाङ्मयेतिहासकाराची आहे. व्यक्तीवर समाजातील अनेक परंपरा, क्रिया-आंतरक्रिया, संस्कार यांचा परिणाम सतत होत राहतो. वाङ्मयातून समाजजीवन आविष्कृत होत राहते. त्यामुळे वाङ्मयेतिहासकार शुद्ध वाङ्मयीन दृष्टीचा

असत नाही. **वाङ्मयाकडूनही आपल्या काही अपेक्षा असतात. त्या केंद्रस्थानी ठेऊन काही तत्त्वे, निकष आणि संकल्पनाच्या आधारे एक वाङ्मयेतिहासकाराचा दृष्टिकोन लिहिला पाहिजे** अशी अपेक्षा अभ्यासकांकडून व्यक्त केली जाते

**व्यापक अशा वाङ्मयाच्या पसाऱ्यातून साहित्याच्या एखाद्या दुसऱ्या पैलूला प्राध्यान्य देऊन कोणत्याही साहित्याचा इतिहास लिहिला जातो. पण तो संपूर्ण साहित्याचा इतिहास ठरत नाही**

**साहित्य ही व्यापक सांस्कृतिक घटना असल्यामुळेच साहित्यक्षेत्रातील विविध शाखांवर साहित्येतिहासाची मांडणी अवलंबून असते**

प्रचलित आणि सोयीची असणारी मराठीच्या वाङ्मयेतिहासाची कालखंडात्मक आखणी ही सामाजिक किंवा राजकीय घटकांना प्राधान्य देणारी आहे परंतु **विचार, कल्पना, घटना इ. नवप्रवर्तन करणाऱ्या घटितांना प्राधान्य देऊन कालखंड पाडणे जास्त संयुक्तिक ठरेल असे काही अभ्यासकांनी सूचविले आहे**

साहित्यात काही ठळक नजरेत भरणाऱ्या प्रवाहांच्या जोडीने इतर अनेक प्रवाह असतात. हे **सर्वच प्रवाह वातावरणाच्या आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत असतात. विद्वान लोकांचे साहित्य, रंजनप्रवण सामान्य दर्जाचे साहित्य, लोकसाहित्य इ. साहित्याचे परस्पर संबंध तपासणे, त्यांची नोंद घेणे महत्त्वाचे असते.**

**साहित्येतिहास लेखनात प्रत्येक वाङ्मयेतिहास स्वतंत्र इतिहास लिहिला जाणे योग्य असते. त्याचबरोबर शाखोपशाखांचे पोट इतिहास लिहिण्याची आवश्यकता आहे.** उदा. कादंबरी, नाटक, कविता, कथा असे इतिहास लिहिले जातात. पण नाटकांचा इतिहास म्हटले की रंगभूमीच्या इतिहासाचाही विचार होणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

**साहित्याची निर्मिती, साहित्याची शैली किंवा साहित्याचा आस्वाद हा व्यक्तिनिष्ठ असतो. पण ती निर्मिती, शैली किंवा आस्वाद प्रक्रिया ही सामूहिक परिमाणाची असते. त्या शैलीबरोबर त्या काळाचे काही शैलीविशेष त्यातून प्रकट होतात. त्यामुळे साहित्यनिर्मिती ही व्यक्तिगत क्रिया असली तरीही साहित्याचा इतिहास हा मानवी संवेदनशीलतेचा बनून जातो.**

**साहित्याचा इतिहास समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचे एक अंग असते** त्या युगाची प्रकृती असते. इतिहासकार भूतकालीन घटनांचा वर्तमानकालीन ज्ञानाच्या संदर्भात शोध घेत असतो. भूतकाळाची पुनर्निर्मिती कशासाठी ? कोणासाठी ? या प्रश्नांचा विचार इतिहास लेखक करतो.

**साहित्यकृती ही वस्तू नसते. ती आस्वादकाच्या वृत्ति-प्रवृत्तीनुसार चैतन्यपूर्ण बनते कधी त्या कृतीचे रंगरूपही बदलतात. साहित्य हे या अर्थाने मूलभूत मानवी प्रेरणांशी संबंधित असते याच मानवी प्रेरणांवर सनातन साहित्याची इमारत उभी असते. तिचा संबंध कालसापेक्षतेशी नसतो किंवा गौण असतो** उदा. बालकवींची औदुंबर ही कविता कोणत्याही काळातील रसिकांना भावते

**थोडक्यात** मराठी वाङ्मयेतिहास हा साहित्याच्या इतिहासाचा भाग असतो. भूमी, संस्कृती, इतिहास या घटितांना लक्षात घेऊन मराठीत लिहिले गेले ते मराठी साहित्य, समाज, संस्कृती, धर्मकल्पना, तत्त्वज्ञान, आर्थिक स्थिती, राजकीय घडामोडी, वर्णवर्ग, वाङ्मयीन व कलापरंपरा, नैसर्गिक पर्यावरण, जीवनदृष्टी, भूमिका, कालखंड इत्यादी गोष्टी वाङ्मयेतिहासात लक्षात घेतलेल्या असतात.

## २) मराठी वाङ्मयेतिहासाचे कालखंड : स्वरूपचर्चा

**वाङ्मयाचा प्रवाह सलग असला, तरी वाङ्मयेतिहासलेखनासाठी त्याचे कालखंड कल्पावे/पाडावे लागतात. राजकीय-सामाजिक इतिहासांच्या प्रभावामुळे बहुतांश आरंभकालीन वाङ्मयेतिहासांमध्ये राजकीय-सामाजिक स्थित्यंतरांनाच अनुलक्षून कालखंड कल्पिले गेले** एवढेच नव्हे तर त्यांना तशी नावेही दिली गेली. उदा., ‘व्हिक्टोरियन एज’ किंवा ‘यादवकालीन मराठी वाङ्मय’ इत्यादी. राजकीय-सामाजिक स्थित्यंतरे अनेकदा वाङ्मयेनिर्मितीवर, वाङ्मयप्रवाहांवर परिणाम करतात हे खरे; पण ती स्थित्यंतरे आणि वाङ्मयीन स्थित्यंतरे ही समांतर असतातच असे नाही लेखकनिष्ठ वाङ्मयेतिहासात प्रभाव गाजवणाऱ्या लेखकांनुसार कालखंड कल्पिले जातात आणि त्यांना तशीच नावे दिली जातात उदा., ‘शेक्सपीरियन एज’, ‘चिपळूणकर पर्व’ इत्यादी. मुळात लेखकनिष्ठ वाङ्मयेतिहास हा प्रकार बाद करण्याच्या योग्यतेचा आहे, हे पूर्वी आलेले आहेच शिवाय एका किंवा दोन लेखकांचा प्रभाव समग्र वाङ्मयावर असण्याची संभवनीयताही कमीच. त्यामुळे राजकीय-सामाजिक स्थित्यंतरांनुसार किंवा महत्त्वाच्या लेखकानुसार कालखंड कल्पिणे रास्त नव्हे.

**वाङ्मयेतिहासाचे लक्ष वाङ्मयीन स्थित्यंतराकडे असल्याने वाङ्मयेतिहासकाराने आपले कालखंड महत्त्वपूर्ण वाङ्मयीन परिवर्तनांच्या टप्प्यांवर मानणे रास्त ठरेल** त्यांचे नामकरणही अर्थात तसेच करायला हवे. परंपरा व नवता यांचा संघर्षवाढत वाढत विकोपाला जातो आणि पंरपरा क्षीण होऊन नवता तिची जागा घेते आणि वाङ्मयीन परिवर्तन दृग्गोचर होते. हे परिवर्तन वाङ्मयनिर्मिती, त्याची रचना, आशय, शैली, वाङ्मयप्रकार इ. अनेक घटकांमध्ये स्पष्टपणे दिसून येते आणि मग अशा वेळी वाङ्मयीन टीकाही अपरिहार्यपणे आपला व्यूह व दृष्टी बदलते. अशा रीतीने एकूण वाङ्मयप्रवाहालाच ढळ पोहोचतो व स्थित्यंतर अवतरते. अशा तीन टप्प्यावर कालखंड कल्पिता येतात.

स्थित्यंतराच्या किंवा परिवर्तनाच्या या मुद्यालाच जोडून इतिहासातील प्रगती (प्रोग्रेस) आणि उत्क्रांती (इव्होल्यूशन) या तत्त्वांचा वाङ्मयेतिहासाच्या संदर्भात असणारा विशिष्ट अर्थ स्पष्ट करता येईल. भौतिक प्रगती ही भौतिक ज्ञानाच्या प्रगतीवर आधारलेली असल्याने तिचा उन्नत आलेख स्पष्ट दिसतो. वाङ्मयामध्ये कालच्या वाङ्मयापेक्षा आजचे वाङ्मय जास्त चांगले, अधिक श्रेष्ठ इ. प्रकारचे सरळ उन्नत आलेख संभवत नाहीत. काही वाङ्मयीन परंपरा कालौघात अस्तंगत होताना दिसतात व त्यांची जागा नव्या परंपरांनी घेतलेली दिसत नाहीत्यामुळे **वाङ्मयीन प्रगतीचे सरळ एकदिक् चित्र संभवत नाही.** वाङ्मयीन प्रगतीचे एकमात्र मोजमाप म्हणजे समाजाची संवेदनशीलता हे होय. लेखक, रसिक व एकूण समाज यांची संवेदनशीलता एवढ्याच संदर्भ वाङ्मयीन प्रगतीचा कदाचित आलेख काढता येईल. डार्विनचा उत्क्रांतिवादाचा नियमही वाङ्मयास तंतोतंत लागू पडत नाही, हे वाङ्मयप्रकारांच्या विकास-ऱ्हासांकडे पाहिले की कळते. **वाङ्मयेतिहास हा इतर प्रकारच्या इतिहासांपासून याही कारणाकरिता वेगळा ठरतो.**

वाङ्मयेतिहासकाराने समग्र वाङ्मयाचे अवलोकन करावे, या अपेक्षेतून वाङ्मयीन भूगोल (लिटररी जिऑग्राफी) ही कल्पना पुढे आली आहे. सामान्यतः प्रत्येक भाषेत, प्रत्येक कालखंडात वाङ्मयनिर्मितीची दोनचार केंद्रे प्रभावी असतात. त्यामुळे त्या केंद्राभोवतीच्या वाङ्मयाचा इतिहास तेवढा लिहिला जातो व अन्य केंद्रातील वाङ्मय दुर्लक्षिले जाते **वाङ्मयीन भूगोलाची कल्पना राबवण्याने ही अव्याप्ती टळेल.**

वाङ्मयेतिहासकाराने समग्र वाङ्मयाचे अवलोकन करावे अशी जरी अपेक्षा असली, तरी सर्व **वाङ्मयकृतींना व सर्व लेखकांना वाङ्मयेतिहासामध्ये स्थान देणे शक्यही नसते व रास्तही नसते.**

वाङ्मयेतिहासकाराने भरड वाङ्मयकृतींची दखल घ्यायची नसते; पण लोकप्रिय साहित्य हे वाङ्मयीन मूल्य असणारे साहित्य व भरड साहित्य यांना सीमावर्ती असते, **त्यामुळे लोकप्रिय वाङ्मयाची दखल निदान प्रवाहाच्या अंगाने का होईना वाङ्मयेतिहासकाराने घेणे इष्ट ठरते. त्यामुळे वाङ्मयीन चलनवलनाचे समग्र चित्र उभे करू शकतो.**

**वाङ्मय ही एकाकी घटना नाही. वाङ्मयाला समग्र सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय इत्यादींची पार्श्वभूमी असते. या सर्व घटकांचे यथायोग्य व कालसंगत आकलन करून घेता यावे म्हणून कालपटाची कल्पना पुढे आली आहे. वाङ्मयीन घटना ज्या काळी घडली त्या काळी सांस्कृतिक, सामाजिक इ. अन्य क्षेत्रांत कोणकोणत्या घटना घडल्या यांचा सनवार तक्ता म्हणजे कालपट** अशा कालपटाच्या अवलोकन-निरीक्षणातून वाङ्मयीन घटनांचे अन्य घटनांशी असणारे नाते उमगण्यात मदत होते. मराठीच्या संदर्भात असा कालपट तयार करून त्याच्या आधारे आपली निरीक्षणे नोंदविण्याचा पहिला प्रयत्न प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड सहावा, भाग पहिला, १९८८) या ग्रंथात केलेला आहे.

**उदा. मराठी साहित्याचा १९२१ ते १९४५ आणि १९४६ ते १९६० असा कालखंड कल्पून वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास करण्यात येतो.** १९२१ असा कालखंड निश्चित करताना इ.स. १९२० आसपास बालकवी, राम गणेश गडकरी, ना. वा. टिळक, हरिभाऊ आपटे अशा अनेक मान्यवर **लेखक – कवींचा मृत्यू** झाला. यामुळे मराठी वाङ्मयक्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. जगाच्या आणि भारताच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे **पहिले महायुद्ध** या काळात संपले. शिवाय **लोकमान्य टिळकांसारख्या** राष्ट्रीय नेत्याचा १ऑगस्ट १९२० रोजी मृत्यू झाला. म्हणजे टिळक युगाचा अस्त आणि **गांधी युगाचा उदय** झाला. या सर्व वाङ्मयीन आणि राजकीय घडामोडींमुळे १९२१ ही या कालखंडाची सुरूवात निश्चित करण्यात येते.

१९२१ ते १९४५ हा कालखंड म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातले हे गांधीयुग होते. महात्मा गांधींची समग्र जीवनाविषयीची विचारसरणी आणि त्यांची शांततामय असहकाराची कृती, अहिंसेवर दिलेला भर या विविध गोष्टींनी भारतीय जनता गांधींच्या चळवळीने भारली गेली होती. या कालखंडाची उत्तर सीमा १९४५ ही निश्चित करण्यात आली. कारण **जगाच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे दुसरे महायुद्धाची अखेर, त्यानंतर भारताला मिळालेले स्वातंत्र्य** अशी अनेक कारणे सांगता येतील.

**वाङ्मयासंबंधीचे नवे संशोधन प्रकाशात येत असते** वाङ्मयसिद्धान्तांची नवी मांडणी, पुनर्मांडणी होत असते. वाङ्मयीन टीकेचे नवनवीन व्यूह समोर येत असतात. तसेच वाङ्मयाकडे पाहण्याचे समाजाचे दृष्टिकोणही बदलत असतात. या सर्व गोष्टींमुळे वाङ्मयेतिहासाचे सातत्याने पुनर्लेखन होण्याची गरज असते.

**वाङ्मयेतिहास कोणासाठी, म्हणजे वाङ्मयेतिहासाचा वाचक कोण, हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे.** आजवर सगळीकडे सामान्यतः विद्यापीठीय विद्यार्थी आणि वाङ्मयाचे अभ्यासक एवढेच काय ते वाङ्मयेतिहासाचे वाचक अशी स्थिती होती. त्यामुळे बहुतेक भाषांतील वाङ्मयेतिहासलेखन हे विद्यापीठीय किंवा अभ्यासविषयक गरज भागवणारे म्हणूनच झाले आहे परंतु वाङ्मय हे समाजातील सर्वांसाठी असल्याने वाङ्मयेतिहासही अशा सर्वांसाठी, निदान जिज्ञासू सामान्य वाचकांसाठी, सिद्ध व्हायला हवा. कारण वाङ्मयकृतीच्या यथार्थ आस्वादासाठी/आकलनासाठी एकूण वाङ्मयीन परंपरा माहिती असणे आवश्यक असते. परभाषक मंडळींच्या जिज्ञासापूर्तीसाठी अन्य भाषांतून वाङ्मयेतिहास लिहिले जाण्याची गरजही आज निर्माण झालेली आहे. परभाषकांसाठी लिहिलेल्या वाङ्मयेतिहासाचे स्वरूप अर्थातच वेगळे, सामान्यतः जिज्ञासापूर्तीपुरते म्हणजे परिचयप्रधान, वर्णनात्मक असे राहील, हे उघडच आहे. वाङ्मयेतिहासाचा वाचक अशा निरनिराळ्या अपेक्षा ठेवणारा असल्याने एकाच वेळी एकाच भाषेतील वाङ्मयाचे विविध प्रकारचे वाङ्मयेतिहास लिहिले जाणे आवश्यक ठरते.

**बहुभाषिक राष्ट्रामध्ये आणखीही एका वेगळ्या प्रकारच्या वाङ्मयेतिहासाची आवश्यकता असते.** अशा राष्ट्रातील प्रत्येक भाषेतील वाङ्मय आपापल्या देशी संवेदना **(नेटिव्हिस्टिक सेन्सिबिलिटी)** जपून असते. पण त्याच वेळी ते राष्ट्रीय एकात्म संवेदनशीही इमान राखून असते. त्यामुळे अशा सर्व वाङ्मयांचा राष्ट्रीय पातळीवरील एकात्म इतिहास लिहिण्याची गरज असते. **बहुभाषिक राष्ट्रात त्या राष्ट्रांतील सर्व भाषांतील वाङ्मयांचा एकत्रित, सर्वसमावेशक आणि सर्वसमन्वयक असा तौलनिक वाङ्मयेतिहास लिहिला जाणे आवश्यक असते.** उदा., भारतीय वाङ्मयेतिहासकारांसमोर असा वाङ्मयेतिहास सिद्ध करण्याची जबाबदारी उभी आहे. इतर बहुभाषिक राष्ट्रे आणि भारत यांमध्ये पुन्हा एक भेद आहे तो म्हणजे भारतामध्ये एकाच वेळी आर्य भाषाकुल आणि द्रविड भाषाकुल या जगातल्या दोन मोठ्या भाषाकुलांतील अनेक भाषा आपापल्या दीर्घ वाङ्मयीन परंपरांसह नांदत आहेत. त्यांचा मेळ कसा घालायचा? सर्वांना समान ठरेल अशी पूर्वकालीन कोणती वाङ्मयपरंपरा

स्वीकारायची? **विविध प्रांतांतील प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन वाङ्मयांच्या विकासरेषा असमांतर राहिल्याने एकत्रित वाङ्मयेतिहासलेखनामध्ये त्यांची कालसंगती कशी राखायची?**–असे तात्त्विक प्रश्न तर उद्भवतातच; पण सर्वांत मोठा व्यावहारिक प्रश्न म्हणजे सर्व भाषांतील वाङ्मयपरंपरा, वाङ्मयकृती, वाङ्मयीन वातावरण इ. माहितीची जुळवाजुळव कशी करायची, हा आहे. कारण भारतीय वाङ्मयेतिहास लिहिणाऱ्या लेखकाला किंवा लेखकगटाला सर्वच्या सर्व भारतीय भाषांमध्ये गती नसणार आणि भाषांतर पद्धती वापरायची म्हटले तर एक तर ते वेगळे प्रचंड कार्य निर्माण होईल. शिवाय **भाषांतरित कृतींच्या मूल्यमापनाला मर्यादा असतात.**

**भारतीय वाङ्मयेतिहास हीच एक स्वतंत्र अभ्यासशाखा मानून** डॉ. सुजित मुखर्जींयांनी टोवर्ड्स अ लिटररी हिस्टरी ऑफ इंडिया (१९७५) आणि सम पोझिशन्स ऑफ अ लिटररी हिस्टरी ऑफ इंडिया (१९८१) असे दोन तात्त्विक ग्रंथच सिद्ध केलेले आहेत. हे ग्रंथ सिद्ध करून डॉ. मुखर्जी यांनी विशिष्ट परिस्थितीतील **बहुभाषिक राष्ट्रातील वाङ्मयेतिहासलेखन कसे असावे,** यासंबंधीच्या विचाराचे योगदान वाङ्मयेतिहास या अभ्यासशाखेला दिले आहे आणि एका रीतीने ती अभ्यासशाखा समृद्ध केली आहे.

**मराठीतील वाङ्मयेतिहासविचाराला गेल्या शंभर एक वर्षांची परंपरा** असूनही तो बव्हंशी स्फुट लेखांच्या स्वरूपात झाल्याने त्याचे असे स्वतंत्र शास्त्र निर्माण होऊ शकले नाही. भारतातील अतःएव मराठीतील आधुनिक इतिहासविचार हाच मुळात मेकॉलेप्रभृतींना उत्तर देण्याच्या ऊर्मीतून जन्म पावला.त्याचा आरंभकाळातील वाङ्मयेतिहासलेखन आणि वाङ्मयेतिहासविचार यांवर बरावाईट परिणाम झालेला दिसतो.

**मराठीतील वाङ्मयेतिहासविचाराचे तीन टप्पे दिसतात.** पहिला टप्पा १९४५ पर्यंतचा ठरतो. त्यात वर निर्देशित केलेल्या ऊर्मीवर आधारित विचारमंथन येते. पण या कालखंडात महत्त्वाचे योगदान वि. का. राजवाडे (१८६४–१९२६) यांचेच ठरते. त्यांनी आपल्या **'महाराष्ट्रातील प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास'** (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संपादित राजवाडे लेख संग्रह: पृ. ९६ ते १०९ ) या लेखात 'सारस्वताचा ऊर्फ विदग्ध वाङ्मयाचा इतिहास हा वाङ्मयेतिहासाचा एक अंश आहे', अशी भूमिका घेऊन 'वाङ्मय' या संज्ञेची व्याप्ती वाढविली आहे. **'गणन, कार्यकारणसंबंधदर्शन व वर्गीकरण ह्या दृष्टीने वाङ्मयाची स्थित्यंतरे सांगणे म्हणजे वाङ्मयाचा शास्त्रीय इतिहास रचणे'** इतकी ते वाङ्मयेतिहासाची प्रगत व्याख्या त्या काळात देतात.

**मराठी वाङ्मयेतिहासविचाराचा दुसरा टप्पा १९४५ ते १९६०** असा मानता येतो. यांत महाराष्ट्र साहित्य परिषदेने अंगीकृत केलेल्या वाङ्मयेतिहासयोजनेसंबंधीचा १९५२ ते ५४ या काळात झालेला वाद येतो. हा वाद **'माटे-बेडेकर वाद'** या नावाने ओळखला जातो. या वादाचे फलित म्हणजे वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेसंबंधाने आणि मराठी वाङ्मयेतिहासाच्या मांडणीच्या संबंधाने मराठीमध्ये अनेक विद्वानांकडून भरपूर विचारमंथन झाले अखेरीस **श्री. म. माटे** (१८८६–१९५७) यांनी सिद्ध केलेली लेखकनिष्ठ वाङ्मयेतिहासाची योजना सोडून सामाजिक स्थित्यंतराची पार्श्वभूमी स्वीकारणारी वेगळी योजना तज्ज्ञांकरवी तयार करण्यात आली व या वादावर पडदा पडला.

**मराठीतील वाङ्मयेतिहासविचाराचा तिसरा टप्पा म्हणजे** १९६० नंतरचा कालखंड मराठवाडा विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, इ. प्रादेशिक विद्यापीठांच्या स्थापनांमुळे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाला चालना मिळाली आणि अध्यापनासंबंधानेच तात्त्विक व व्यावहारिक प्रश्न निर्माण झाले त्यातून मुंबई विद्यापीठाने १९७१ मध्ये मुंबई व गोवा येथे आणि मराठवाडा विद्यापीठाने १९७२-७३ मध्ये औरंगाबाद येथे वाङ्मयेतिहासाच्या अध्यापनासंबंधाने चर्चासत्रे घेतली त्यामुळे मराठीत वाङ्मयेतिहासाच्या विचाराला चालना मिळाली. प्रा. गो. म. कुलकर्णी, डॉ. व. दि. कुलकर्णी व डॉ. दत्तात्रय पुंडे या तिघांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेसाठी १९८१ मध्ये 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या विषयावर आणि त्याचा पाठपुरावा करणारे १९८२ मध्ये 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची मांडणी' या विषयावर अशी दोन चर्चासत्रे घेतली. वाङ्मयेतिहासाची संकल्पना हा संपादित ग्रंथ हे या चर्चासत्राचे फलित होय मराठीत वाङ्मयेतिहासाची सशास्त्र चर्चाचिकित्सा होण्यास या ग्रंथाने चालना दिली आहे.

-----------------------------------------------------------------------------------------

## मराठी भाषा व साहित्याचा उगम: (कोरीव लेख आणि ग्रंथ या साधनांच्या आधारे)

**शिलालेख, ताम्रपट व इतर ग्रंथातील उल्लेखानुसार** मराठी भाषेच्या उत्पत्तिसंदर्भात काही भूमिका मांडता येते. मराठी ही आठव्या शतकात ती लोकांची बोलीभाषा होती, असा अंदाज बांधता येतो. आठव्या – नवव्या शतकापासून ती व्यावहारिक लिखाणाने व ग्राम्य गीतरचनेने वाढीस लागली असावी असेही अनुमान काढता येते. मराठीचे अस्तित्व सातव्या – आठव्या शतकात शब्दरूपाने, अकराव्या शतकात **(शिलालेखाद्वारा–'श्री चावुण्डराजे करवियले)** वाक्यरूपाने आढळते आणि बाराव्या शतकात ती ग्रंथरूपाच्या दालनात पदार्पन करताना आढळते.

**इतिहासाचार्य राजवाडे यांनी मराठी भाषेचा मूलारंभ इ.स. ४८८ सांगितलेला आहे.** त्यांच्या मते सातवाहन राजवटीत महाराष्ट्री प्राकृत भाषेत विपुल वाङमय लिहिले गेले असले तरी सातवाहनांच्या राजवटीनंतरच्या अराजकात महाराष्ट्रीचा लोप झाला. मराठी भाषेचा उत्पत्तिकाळ आपणांस इ.स. ६८० पर्यंत मागे नेता येतो. **इ.स.६८०च्या ताम्रपटात सांब्राज्य, पन्नास, प्रिथिवी असे काही मराठी शब्द आढळतात.** इ.स. **६९९च्या चिकुर्डे येथील ताम्रपटात आचलित, करवून, करित यांसारखे** मराठी शब्द दिसतात. पुढे शिलालेखात मराठीची शब्दसंख्या वाढत गेली. शिलालेख म्हणजे प्राचीन मराठीतील अक्षर वाङमय होय. इ.स.१०१२ च्या अक्षीला शिलालेखात मराठी वाक्य मिश्र स्वरूपात आढळते. तर **इ.स.१११६ मधील श्रवणबेळगोळच्या शिलालेखात कोरलेले 'श्री चावुण्डराजे करविले'** हे पहिले मराठी लिखित वाक्य असल्याचा निर्वाळा काही अभ्यासक देतात. दरम्यानच्या काळात आठव्या शतकाच्या अखेरीस उद्योतनसूरीने लिहिलेल्या 'कुवलयमालाकथा' या ग्रंथात अठरा देशी भाषांचा उल्लेख केलेला असून त्यात 'मरहट्ट' भाषेचा समावेश आहे. 'मरहट्ट' हे प्राचीन काळचे मराठीचे नाव होते.

मराठी भाषेच्या उत्पत्तिविषयी विविध मतमतांतरे आहेत. काही अभ्यासकांच्या मते संस्कृत हीच मराठीची जननी आहे. तर काही वेदकालीन बोलींपासून मराठीची निर्मिती झाली असे मानतात. तर काही जणांनी सर्व **प्राकृत भाषा, अपभ्रंश आणि संस्कृत यांच्यापासून मराठीचा जन्म झाला, असे प्रतिपादन केलेले आहे.**

### मराठी साहित्याचा आरंभ –

'लीळाचरित्र' अथवा 'ज्ञानेश्वरी' या आधीचे ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे आद्य मराठी ग्रंथ कोणता हा प्रश्न वारंवार उपस्थित होतो. मुकुंदराजांचा **'विवेकसिंधु' (इ.स.११८८)** हा आद्यग्रंथ समजला जातो पण त्याबद्दल बरेच संशोधक आक्षेप घेतात.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी **श्रीपतीभट्ट विरचित 'ज्योतिषरत्नमाला'** या संस्कृत ग्रंथाची त्याने स्वत:च केलेली टीका (इ.स.१०५०) हा मराठीतील पहिला उपलब्ध ग्रंथ असल्याचे म्हटले आहे. मराठी वाङमयकोशात (खंड पहिला, संपादक गं.दे.खानोलकर) तसा उल्लेख आहे. त्यामुळे मराठीतील सर्वात प्राचीन असा हा ग्रंथ असल्याचे आज तरी मानावयास हरकत नाही. **ज्योतिषरत्नमाला – विवेकसिंधु – लीळाचरित्र – ज्ञानेश्वरी हे मराठीचे आद्यग्रंथ मानले जातात.**

उपलब्ध ग्रंथांच्या आधाराने मराठी साहित्याच्या इतिहासाचा आरंभ यादवकाळात होतो. **महाराष्ट्री – प्राकृत, महाराष्ट्री – अपभ्रंश, मराठी हा भाषिक परिवर्तनाचा काळ या राजवटीत होतो.** साहित्यात संस्कृत ऐवजी प्राकृताचा अवलंब ही गोष्ट जरी सातवाहनांच्या काळात घडलेली असली तरी धर्मकारणासाठी मराठीचा अवलंब ही घटना यादवकाळात घडलेली आहे. त्यामुळे मराठी साहित्य परंपरांचा विचार करताना **विविध पंथ आणि संप्रदाय (नाथ, महानुभाव, वारकरी) यांचाही विचार आवश्यक ठरतो.**

### शिलालेख आणि ताम्रपट : गद्याच्या पाऊलखुणा –

बहुतांश मराठी साहित्य पद्यात्मक असले तरी मराठीतील आद्य मराठी ग्रंथ **'ज्योतिषरत्नमाला' आणि 'लीळाचरित्र'** हे गद्यात आहेत. मराठी भाषेचा माग घेताना आढळलेल्या शिलालेखांत आणि ताम्रपटांत गद्याच्या पाऊलखुणा सापडलेल्या आहेत. मराठीतील उपलब्ध अशा पहिल्या मानल्या जाणाऱ्या शिलालेखात (अक्षी, जि. कुलाबा, इ.स.१०१२) **'केशिदेवाचा महाप्रधान भइर्जु सेणुई याने देवीच्या बीडणासाठी नऊ कुली धान्य'** दिल्याचा उल्लेख आहे. या लेखाच्या शेवटी **'जगी सुष संतु' (जगात सुख असो)** असे म्हटले आहे. दिवेआगार येथील ताम्रपट हा मराठी भाषेतील आद्य (इ.स.१०६०) ताम्रपट आहे. डॉ.म.गो.दीक्षित यांच्या मतानुसार संपूर्णपणे मराठीत लिहिलेला हा ताम्रपट असून याची लिपी अकराव्या शतकातील नागरी लिपी आहे तर या लेखाची भाषा प्राचीन मराठी आहे. शिलालेखावरून भाषेचे वळण कळते. तसेच लिपीतील बदलही समजतात.

### सारांश –

**अशा प्रकारे इ.स. १३ व्या शतकाच्या अगोदरच्या काळातील मराठी साहित्य परंपरा कोरीव लेख आणि प्राकृत मराठी ग्रंथांच्या माध्यमातून सांगता येते.**

..........................................................................................................................